**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २० ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग विधेयक लोकसभेत पारित.**
2. **राज्यासह विदर्भात अनेक जिल्ह्यात पावसाचा जोर, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त भागाची केली पाहणी.**
3. **विद्यार्थी स्कुल व्हॅन नियमावली अंतिम करून अधिसूचना जारी करावी- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश.**
4. **"राष्ट्रीय सुरक्षेसाठी तरुणांची भूमिका आणि विकास" या विषयावर नागपूरच्या व्हीएनआयटी येथे 22 ते 23 ऑगस्टदरम्यान परिषदेचे आयोजन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी करणार उद्घाटन.**

------------------------------------

गेमिंग संशोधन विधेयक

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सादर केलेलं ऑनलाईन गेमिंग संशोधन विधेयक लोकसभेत पारित झाल. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक खेळ आणि सामाजिक खेळ यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला प्रोत्साहन आणि नियमन करणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं. याद्वारे, अशा गेम्समध्ये फसवणूक होऊन नागरिकांवर, विशेषतः तरुणांवर होणारे सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि गोपनीयतेशी संबंधित दुष्परिणाम टाळायला मदत होईल.

------------------------------------

संसद गदारोळ

बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

आज सकाळी लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षांनी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी करत निदर्शनं सुरु केली. त्यामुळे सभापतींनी लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ लोकसभेत सादर केलं. ऑनलाईन गेमिंगमुळे होणारे दुष्परीणाम रोखणं, हे या विधेयकाचं उद्दीष्ट आहे. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'घटना दुरुस्ती विधेयक २०२५', 'केंद्रशासित प्रदेश सरकार विधेयक, २०२५; 'जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना विधेयक', २०२५ लोकसभेत मांडलं. मात्र गदारोळ सुरुचं राहिल्यानं कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. राज्यसभेतही काहीसं समान चित्र पहायला मिळालं. विविध राजकीय पक्षांकडून १८ स्थगन प्रस्ताव मिळाले असून हे प्रस्ताव फेटाळले असल्याचं, उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. उपसभापतींनी शून्य प्रहर पुकारला, मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी राज्यसभेचं कामकाज प्रथम दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राज्यसभेत IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक, २०२५ सादर केलं.

---

विदर्भ-पूर परिस्थिती

राज्यात मागील चार दिवसांपासून झालेल्या पावसाने सर्वाधिक नुकसान नांदेड आणि वाशिम जिल्ह्यात झाल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. ते आज वाशिम जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केल्यानंतर बोलत होते. या जिल्ह्यांमध्ये ३५० गावं बाधित झाली असून, चार लाख ११ हजार एकरवरील पिकाचं नुकसान झाल्याचं भरणे यांनी सांगितलं. ते म्हणाले.

***(होल्ड बाईट- कृषीमंत्री दत्तात्रय भरणे)***

***राज्यामध्ये खुप मोठ्या प्रमाणामध्ये अतिवृष्टीचा तडाखा बसलेला आहे, सगळ्यात जास्त मोठं नुकसान हे शेतकऱ्यांचे नुकसान ते नांदेड जिल्हा आणि दोन नंबरला वाशीम जिल्ह्यात झालेला आहे. साधारणतः ३५० गावांत याची खुप मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झालेले साधारणतः ४ लाख १८ हजार एकर***

***शेतकऱ्यांच पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले काही ठिकाणी जनावरे वाहून गेले, एक दोन ठिकाणी मनुष्य हानी पण झालेले आहे मी आपल्या माध्यमातून माझ्या शेतकरी बांधवांना हि खात्री ग्वाही देतो की निश्चित प्रकारे शासन आपल्या बरोबर आहे.***

गडचिरोली जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे नद्या-नाल्यांचा पूर कायम असून, भामरागड तालुक्यात ४२ वर्षीय व्यक्ती पुरात वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान मागील चोवीस तासांत भामरागड तालुक्यात सर्वाधिक ७५ मिलिमीटर पाऊस पडला. त्या खालोखाल कुरखेडा तालुक्यात ४९.१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. पुरामुळे आलापल्ली-भामरागड आणि सिरोंचा-जगदलपूर या राष्ट्रीय महामार्गासह ११ मार्गांवरील वाहतूक ठप्पच आहे. अकोला जिल्ह्यात आज पावसाचा जोर काहीसा कमी झाला असून, पूर परिस्थिती कायम असल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे. यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. अनेक ठिकाणी पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांनी पुरस्थितीचा आढावा घेतला. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा. पंचनामे करतांना एकही नुकसानग्रस्त शेतकरी सुटणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

-----------------------------------

उमेदवारी अर्ज

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी पी राधाकृष्णन यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांच्यासह एनडीएच्या घटक पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. इंडिया या विरोधी पक्षांच्या आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उपराष्ट्रपती पदाची निवडणूक नऊ सप्टेंबरला होणार आहे.

-----------------------------------

राजीव गांधी जयंती

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहिली. नवी दिल्लीतील वीरभूमी इथं राजीव गांधी यांच्या समाधीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या

प्रियंका गांधी यांच्यासह इतर पदाधिकार्यांनी पुष्पांजली वाहिली. संसदेच्या केंद्रीय सभागृहातही लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह इतर सदस्यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. नागपूर महानगरपालिके द्वारे देखील देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

-----------------------------------

व्हॅन नियमावली

शालेय बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी अनधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या पालकांना राज्य शासनाकडून दिलासा मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन नियमावली आणण्यात येत आहे. ही नियमावली अंतिम करून याबाबत तातडीने अधिसूचना जारी करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज दिले. यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, अत्याधुनिक सुरक्षा व सुविधांनी युक्त असलेली अधिकृत स्कूल व्हॅन विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी आधीच्या नियमात बदल करण्यात येऊन नियमावली सुटसुटीत करावी. स्कूल व्हॅनचे भाडे मासिक तत्वावर आणि वर्षाच्या १० महिने कालावधीपर्यंतच घेण्याबाबत बंधन असावे. नियमावली मध्ये परिवहन समित्यांचे सक्षमीकरण, महिन्यातून एकदा समितीची बैठक होणे, प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक नोडल अधिकारी नेमणे अंतर्भूत असावे असेही यावेळी परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

-----------------------------------

व्हीएनआयटी परिषद

विश्वेश्वरैया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) इथं "राष्ट्रीय सुरक्षेसाठी तरुणांची भूमिका आणि विकास" या विषयावर दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी, 22 ऑगस्ट रोजी सकाळी 10:00 वाजता, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या राष्ट्रीय परिषदेचे ऑनलाइन उद्घाटन होणार आहे. या परिषदेचा मुख्य विषय अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक सुरक्षा आणि सायबर सुरक्षा यासारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर केंद्रित आहे.ही परिषद युथ फॉर नेशन (YOUTH4NATION) च्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही परिषद व्हीएनआयटीच्या सभागृहात होणार आहे. युवा सक्षमीकरण झालं तर देशाला

आपोआपच संरक्षण सुद्धा लाभेल असं परिषदेचे संरक्षक आणि व्हीएनआयटीचे संचालक प्रा. प्रेमलाल पटेल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले....

*(होल्ड बाईट - व्हिएनआयटी संचालक 31 सेकंद)*

***यंग यूथ को एम्पॉवर कैसे करे एम्पॉवरिंग द यूथ इज मेन स्ट्रेटेजी ऍज एम्पावर कर देंगे, तो सेक्युरिटी तो आ ही जाएगी हर वर्ष की जो पापुलेशन है अराउंड 60% से ऊपर 60-65 के बीच में है, जो युथ में आती है,यही जब युथ हमारे एम्पावर होंगे, वही जो 2047 का विकसित भारत बनने वाला है, आत्मनिर्भर भारत बनने वाला है, उसका हिस्सा बनने वाले हैं तो अभी ये सही टाइम है कि हमारी यूथ को हम एम्पावर करें, जो हमारे देश को आत्मनिर्भर बनाए और विकसित भारत की तरफ आगे ले जाए।***

या दोन दिवसीय परिषदेत अंतर्गत सुरक्षा ,सायबर सुरक्षा तसेच आर्थिक सुरक्षा या विषयावर विविध तज्ञ, पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच माध्यमतज्ञ यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार असून, व्हीएनआयटीच्या सुमारे 300 विद्यार्थ्यांनी या परिषदेसाठी नोंदणी केली आहे. एम्स, आयआयएम नागपूर तसेच शहरातील विविध खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी देखील या परिषदेत उपस्थित राहणार आहेत.

-----------------------------------

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भात आज नागपूर अमरावती आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागपुरात सकाळपासूनच अधून मधून मध्यम स्वरूपाचा पाऊस पडतो आहे. आगामी 23 आणि 24 तारखेला देखील पूर्व विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आलाय. एक जून ते 20 ऑगस्ट दरम्यान सामान्य पाऊस झाल्याचं भारतीय हवामान विभागाच्या नागपूर केंद्राने कळवलं असून सर्वाधिक पाऊस गडचिरोली जिल्ह्यात तर सर्वात कमी पाऊस अकोला जिल्ह्यात झाल्याची नोंद आहे. नागपुरात 741. 1 मिलिमीटर पाऊस या काळात झाल्याचं जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

-----------------------------------

इको फ्रेंडली गणपती

बुलढाणा जिल्ह्यात आदिवासी भागातल्या अनेक शाळांमध्ये विद्यार्थांकरता इको फ्रेंडली गणपती तयार करण्याच्या कार्यशाळेला काल प्रारंभ झाला. जळगाव जामोद तालुक्यातल्या सुनगाव या गावामधल्या शाळेपासून या उपक्रमाला सुरुवात झाली. या उपक्रमामुळे निसर्ग संवर्धनाला मोठा हातभार लागणार असून, विद्यार्थीच आता प्रशिक्षण घेऊन घरीच शाडू मातीच्या मुर्त्या बनवून गणरायाची स्थापना करणार आहेत.

-----------------------------------